॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव ५ (            ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पीएच.डी. कोर्सवर्कच्या ऑनलाईन पेपर १ व पेपर २ पुरवणी परीक्षेला आज दिनांक ५ मे रोजी सकाळी ९.३० वाजता प्रारंभ झाला.

सप्टेंबर, २०१७ मध्ये विद्यापीठातर्फे पीएच.डी. प्रवेशपूर्व परीक्षा (पेट) घेण्यात आली होती. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा कोर्सवर्क जुलै २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आला होता. कोर्सवर्क पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची पेपर १ व पेपर २ ऑनलाईन परीक्षा जानेवारी महिन्यात घेण्यात आली होती. यावेळी ज्या विद्यार्थ्यांना काही अडचणीमुळे परीक्षा देता आली नाही त्या विद्यार्थ्यांसाठी तसेच जे विद्यार्थी पेपर १ व पेपर २ अनुत्तीर्ण झाले होते अशा विद्यार्थ्यांसाठी आज कोर्सवर्कच्या पुरवणी परीक्षेला विद्यापीठाच्या ऑनलाईन एक्झाम सेंटरमध्ये (गणितशास्त्र प्रशाळा) प्रारंभ झाला.

कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यार्थी हित लक्षात घेता जानेवारी महिन्यात ज्या विद्यार्थ्यांना कोर्सवर्क परीक्षेला उपस्थित राहता आले नाही तसेच जे विद्यार्थी पेपर १ व पेपर २ अनुत्तीर्ण झाले होते अशा विद्यार्थ्यांसाठी पीएच.डी. कोर्सवर्क पुरवणी परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. त्याअनुषंगाने आज विधी, एज्युकेशन, फिजीकल एज्युकेशन, केमिकल इंजिनिअरिंग, केमिकल टेक्नॉलॉजी, सिव्हील इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग, बायोकेमिस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी, बॉटनी, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, एन्व्हायर्नमेंटल सायन्स, जिओग्राफी, जिओलॉजी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, मॅथेमॅटिक्स, मायक्रोबायोलॉजी, फिजिक्स, स्टॅटेस्टीक्स, झुलॉजी, फार्मसी या विषयाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. एकुण १०३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून ४१ विद्यार्थी गैरहजर होते.

ऑनलाईन परीक्षा केंद्रास प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील यांनी भेट देवून परीक्षा प्रक्रीयेची पाहणी केली. परीक्षेचे मुख्य समन्वयक डॉ.समीर नारखेडे, तांत्रिक सहायक प्रा.मनोज पाटील, हुसैन दाऊदी, अनिल मनोरे, जी.एन.पवार, सुनील हतागडे, अनिल पाटील, शरद ठाकरे, प्रकाश लंगोटे उपस्थित होते. विषयतज्ज्ञ म्हणून प्रा.प्रमोद पवार व प्रा.बी.वाय.रेड्डी यांनी काम पाहिले.

---

जा.क्र. कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१९ दि. ५ मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

जनसंपर्क अधिकारी

यांचे करीता

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in

फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in